महाराष्ट्र शासन

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १५ मार्च २०२०

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त, सर्व
पोलीस आयुक्त, **सर्व**
पोलीस अधिक्षक, सर्व

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..**
**संदर्भ : शासन समक्रमांक दि.१४ मार्च,२०२० चे पत्र.**

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर या महापालिकांच्या कार्यक्षेत्रातील चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा,नाटयगृहे बंद करण्याबाबत सूचित केले होते. तथापि कोरोना विषाणूचा राज्यात वाढता प्रार्दुभाव लक्षात घेता आता संपूर्ण महापालिका/नगरपालिका/नगरपंचायत या क्षेत्रातील खालील आस्थापना दिनांक ३१ मार्च २०२० पर्यत साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

१. चित्रपटगृहे
२. तरणतलाव
३. व्यायामशाळा
४. नाट्यगृहे
५. म्युझियम

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. प्रदीप व्यास)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई**
प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, पुरातत्त्व विभाग, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव